**चित्र विचित्र**

**पूर्वप्रसिद्धी सकाळ साप्ताहिक (मार्च २०१७)**

"बाबा पेंटिंग कर!" माझी दोन वर्षांची मुलगी हातात क्रेयॉन घेऊन तिच्या छोट्याशा ड्रॉईंग बोर्डवर टांगलेल्या पांढऱ्या कागदाकडे बोट दाखवत माझ्याकडे येते. ती नेहमी माझ्याकडं येताना निळा खडूच घेऊन येते. 'निळा क्रेयॉन बाबाचा' असं समीकरण तिच्या डोक्यात कुठून बसलंय कोण जाणे! कदाचित अमेरिकेतले 'ब्लू फॉर बॉईज, पिंक फॉर गर्ल्स' हे स्टीरिओटाईप्स तिनं तिच्या आईबाबांवरच उलटवायचं ठरवलं असावं. तिच्याबरोबर काहीही आणि कधीही खेळायची माझी तयारी असते, पण चित्रकला म्हणलं की मात्र मी क्षणभर थबकतो. लहानपणीचे ते रम्य, निरागस वगैरे वगैरे दिवस आठवतात आणि चित्रकलेशी जुळवून घेताना कसे नाकीनऊ आले होते त्याच्या स्मृती समोर उभ्या रहातात.

'नर्ड' किंवा पुस्तकी किडा ही विशेषणं लागू शकतील हे माहीत असूनही सांगतो की शाळेत गणित आणि विज्ञान या विषयांशी चांगलीच दोस्ती होती. भाषा तर अगदी मनापासून आवडायच्या. इतिहास, भूगोल यांच्याबद्दल फारशी जवळीक वाटत नसली तरी आमचे व्यावसायिक संबंध का काय म्हणतात ते चांगले होते. पण चित्रकला हा मात्र सुरुवातीपासून शत्रू होता. आता विज्ञान आवडत असलं तरी जीवशास्त्रातल्या आकृत्या त्रास द्यायच्या, कारण तिथे पुन्हा चित्रकला आडवी यायची. नववीत आमच्या घोरपडे सरांनी मी काढलेली मानवी डोळ्याची आकृती बघून "काय रे *** च्या, तू काय रांजणवाडी आलेला डोळा काढलायस वाटतं?" असा लडिवाळ शेरा मारला होता आणि माझ्या आकृतीवर एक भली मोठी फुली काढून ते चालते झाले होते. खरं तर या घोरपडे सरांचा स्वतःचा एक डोळा काणा होता, पण माझ्या आकृतीकडं मात्र त्यांनी तो काणाडोळा केला नव्हता. माझे मित्र किती छानछान चित्रं काढायचे, स्मृतिचित्र काय, संकल्पचित्र काय, स्टिल लाईफ काय, फ्री हॅन्ड काय-काही विचारू नका. माझी मजल मात्र सूर्योदय (त्रिकोणी डोंगर, त्यातून मुंडकं वर काढलेला अर्धवर्तुळाकृती सूर्य, मराठी चार च्या आकाराचे पक्षी, खाली पाणी आणि त्यात तरंगणारी होडी!) किंवा पतंग उडवणारी मुले असल्या बाळबोध चित्रांपलीकडे कधी गेली नाही. पतंग उडवणारी मुले म्हणजे त्यातही शक्यतो मुलगेच असायचे. कारण सौंदर्य हे बघणाऱ्याच्या दृष्टीत असतं वगैरे जरी खरं असलं तरी मी काढलेल्या मुली बघणाऱ्यांना मुळात मुली वाटतील का नाही हीच शंका असायची. हजेरीपटात माझ्या आधी असलेला पानट हा चित्रकलेत पटाईत होता, त्यामुळं त्याची चित्रं पाहून लगेच माझी चित्रं पहाताना आमच्या चित्रकलेच्या सरांना एखाद्या दर्दी चित्रपट समीक्षकाला सत्यजित रेंच्या चित्रपटानंतर साजिद खानचा चित्रपट बघावा लागला तर जसं वाटत असेल तसं वाटत असणार. मला वाटतं की बाकीच्या विषयांत चांगले मार्क्स मिळत असल्यामुळं नाईलाजानं ते मला दरवर्षी चित्रकलेत पास करत असावेत. एका वर्षी आमचे नेहमीचे सर काही महिने रजेवर होते, तेव्हा दुसरे एक सर बदली शिक्षक म्हणून आले होते. चांगले तिशीतले हे सर आम्हाला शिकवायला लागल्यावर काही दिवसांतच नोकरी सोडून, घरदार सोडून अध्यात्माच्या मार्गाला लागले होते. यामागं माझी चित्रकलाच कारणीभूत होती असं माझ्या काही दुष्ट मित्रांचं म्हणणं होतं!

शाळेत त्रासदायक असली तरी थोडी दुय्यम महत्वाची असलेली ही चित्रकला इंजिनियरिंगला गेल्यावर 'इंजिनियरिंग ग्राफिक्स' या नावानं रुद्रावतार धारण करून परत आली. तरी नशिबानं केमिकल इंजिनियरिंगला असल्यानं दोनच सेमिस्टर्सला हा विषय होता. या विषयातल्या माझ्या प्रावीण्याची जाणीव आमच्या सरांनी माझी पहिलीच ड्रॉईंग शीट बघून कठोर शब्दांत करून दिली होती. त्यामुळं एटीकेटी न लागू देता पास होणं एवढंच एक माफक ध्येय मी या विषयाच्या बाबतीत ठेवलं होतं. खरं सांगतो, सेमिस्टरची एक्झाम जवळ आली आहे आणि माझ्या सगळ्या शीट्स इनकम्प्लिट आहेत अशी स्वप्नं अजूनही मला पडतात. पलंगावरची शीट (घामानं) भिजावी एवढी भीती वाटते आणि मी खडबडून जागा होतो. उठून ग्रॅज्युएशनचं सर्टिफिकेट बघून हे स्वप्नच होतं याची खात्री करून घेतो आणि मगच झोपी जातो.

चौथ्या सेमिस्टरला ग्राफिक्समध्ये पास झालो तेव्हाचा प्रसंग आहे. आमच्या होस्टेलला मिठबांवकर नावाचे मालवणचे वॉचमन होते, ते आमच्याकडून फुकटात चहापाणी काढायची एकही संधी सोडायचे नाहीत. रिझल्टनंतर माझा खुललेला चेहरा बघून त्यांनी आशेनं विचारलं होतं, " काय हो, टॉपर वगैरे आले का?"

"नाही हो! ग्राफिक्स टू क्लिअर झालं. आता पुन्हा ग्राफिक्सचं जन्मात तोंड बघायचं नाही!"

"असं? किती मार्क भेटले?"

"१०० पैकी ४३!" मी त्याच प्रफुल्लीत चेहऱ्यानं उत्तर दिलं होतं. त्यानंतर त्यांनी माझ्याकडं जे बघितलं होतं त्याचं वर्णन करायला करुणा, भूतदया, सहानुभूती वगैरे भावनांच्या गटातलेच शब्द वापरावे लागतील. त्या दिवशी चक्क त्यांनी मला चहा पाजला.

तर तेव्हापासून आयुष्यातून गायब झालेली चित्रकला सध्या पुन्हा परत आली आहे. त्यात माझी बायको पटापट छान स्केचेस काढते, त्यामुळं मुलीसमोर थोडा 'इज्जत का सवाल' वगैरे पण असतो. पण आता चित्रकलेचं एवढं दडपण येत नाही. कारण आत्ताचा परीक्षक खूप गोड आहे. त्याच्या अपेक्षाही फार कमी आहेत. उत्तर चुकलं तरी प्रश्न अटेम्प्ट केल्याचे मार्क्स मिळतात. तो मी काढलेली खारुताई उंदीर म्हणून स्वीकारतो, मी काढलेला हंस टर्की म्हणून गोड मानून घेतो. कधीकधी टाळ्या पिटून दादही देतो (माझ्या चित्रांना दाद मिळाल्याची ही पहिलीच वेळ!), त्यामुळं बरं वाटतं.

तरी कधीकधी हा परीक्षकही अवघड पेपर काढतो. सॅन्टा आणि त्याची रेनडिअरवाली स्ले आकाशातून आपल्या घरी येत आहे असं चित्र काढ, अशी फर्माईश होते. मला ब्रह्माण्ड का काय  म्हणतात ते आठवतं. मी आवंढा गिळून हातात पेन्सिल घेऊन कागदाशी झटापट चालू करतो. पण थोड्या वेळानं मुलीच्याच लक्षात येतं की बाबा यात अगदीच कच्चा आहे.  मग तीच उदार मनानं 'बाबा पुस्तक वाचू?' असं विचारून एक एक्झिट स्ट्रॅटेजी उपलब्ध करून देते. मी तिनं दिलेली ही लाईफलाईन ताबडतोब स्वीकारतो आणि (ती आणि मी दोघेही) सुटकेचा नि:श्वास सोडून 'ब्रुनो द टेडी' च्या गोष्टी वाचायला लागतो.

**गौतम पंगू**